MHSN030028742023

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | – | २८/०७/२०२३ |
| नोंदणी दिनांक | – | ०३/०८/२०२३ |
| निकाल दिनांक | – | ०८/०५/२०२४ |
| कालावधी | – | वर्ष महिने दिवस<br>०० ०९ ११ |

**७ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगली यांचे न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी दिव्या प्रज्योत काळे)**

**नियमित फौजदारी खटला क्र. ४७५/२०२३**

**नि.क्र. ३५**

**अभियोग पक्ष** महाराष्ट्र शासन
सांगली शहर पोलीस ठाणे, जिल्हा सांगली.

**अभियोग पक्षातर्फे** श्रीमती ए.आर.दडपे,
सरकारी अभियोक्ता

**आरोपी** १. मनोज रघुनाथ सरगर
वय – ३६ वर्षे, धंदा – समाजसेवक,
रा.जगदाळे प्लॉट, गल्ली नं.१, संजयनगर, सांगली.
२. दिपक विलास शिंदे,
वय – ३३ वर्षे, धंदा –सेंट्रींग,
रा.चैतन्यनगर, दगडे प्लॉट, संजयनगर, सांगली.
३. रविंद्र धोंडिराम माळी
वय – ३१ वर्षे, धंदा – खाजगी नोकरी,
रा.मायाक्का नगर, बामणोली, ता.मिरज जि.सांगली.
४. विश्वास ऊर्फ विश्वनाथ/गबऱ्या नामदेव माने,
वय – ३४ वर्षे, धंदा – सेंट्रींग,
रा.रामरहिम कॉलनी, संजयनगर सांगली.

५. विकास उर्फ चिक्या भानुदार डोंबाळे,
वय – २६ वर्षे, धंदा –खाजगी नोकरी,
रा. कुडचे प्लॉट समोर जगदाळे प्लॉट, संजयनगर सांगली.
६. मनोज शहाजी जाधव,
वय – २१ वर्षे, धंदा – शिक्षण,
रा. जगदाळे प्लॉट हनुमान मंदिराशेजारी, संजयनगर सांगली.
७.अवधुत नितीन पाटील
वय–२५ वर्षे धंदा–मजुरी
रा. समाधान कॉलनी अभय नगर सांगली
८. प्रमोद शरद काळे
वय–२६ वर्षे धंदा–रिक्षा चालक
रा. इंदिरा कॉलनी विजय किराणा दुकानासमोर, संजयनगर सांगली.

**आरोपींतर्फे वकील** विधीज्ञ श्रीमती बी.एम. शेख

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | दि.२९/०४/२०२३ रोजीचे १४.२३ ते १५.०० वा चे सुमारास |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | | ८४/२०२३ दि.२९/०४/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | | २६/०७/२०२३ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | २८/०७/२०२३ |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | | २५/०१/२०२४ |

| | | |
|---|---|---|
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | | २५/०४/२०२४ |
| युक्तिवाद दिनांक | | ०८/०५/२०२४ |
| न्यायनिर्णय दिनांक | | ०८/०५/२०२४ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | | ---- |

## आरोपींची माहिती

<table>
<tr><th>अनु-क्रमांक</th><th>आरोपीचे नांव</th><th>आरोपीस अटक दिनांक</th><th>आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक</th><th>दोषारोपा- तील कलम</th><th>आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले</th><th>आरोपीस झालेली शिक्षा</th><th>फौ.प्र. सं.कलम ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा</th></tr>
<tr><td>१.</td><td>मनोज रघुनाथ सरगर शेख,</td><td rowspan="4">फौ.प्र.सं ४१(१) प्रमाणे नोटीस दि. ३०/०४/२०२३</td><td rowspan="4">२५/०१/२०२४</td><td rowspan="4">भा.दं.वि. सं. कलम १४३,१४७, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये आणि महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम १३५</td><td rowspan="4">निर्दोष मुक्तता</td><td rowspan="4">---</td><td rowspan="4">---</td></tr>
<tr><td>२</td><td>दिपक विलास शिंदे</td></tr>
<tr><td>३</td><td>रविंद्र धोंडिराम माळी</td></tr>
<tr><td>४</td><td>विश्वास उर्फ विश्वनाथ/ गबऱ्या नामदेव माने</td></tr>
</table>

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | विकास उर्फ चिक्या भानुदास डोंबाळे | | | अन्वये | | | |
| ६ | मनोज शहाजी जाधव | | | | | | |
| ७ | अवधुत नितीन पाटील | | | | | | |
| ८ | प्रमोद शरद काळे | | | | | | |

## अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | प्रतिभा दिपक माने | ३२ | वर्दीदार |

## <u>अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज</u>

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | नि. P1/PW1 | वर्दीदाराची मुळ वर्दीवरील सही |
| २. | नि.३४ | घटनास्थळ पंचनामा आरोपीने मान्य केला |

## <u>न्या य नि र्ण य</u>

## (घोषित दिनांक ०८/०५/२०२४.)

१. आरोपी विरुध्द **भारतीय दंड विधान संहिता, १८६० कलम १४३, ४४७, ५०४, ५०६ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम १३५ अन्वये** दंडनीय अपराधाचा आरोप ठेवून प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

२. दिनांक २९/०४/२०३ रोजी १४.३० ते १५.०० वा.चे सुमारास आरोपी हे वर्दीदारचे घरासमोर बेकायदा जमाव व गैरकायद्याची मंडळी जमवून मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचा आदेश क्र. गृह/१/कार्या/६/एम.ए.जी.-१/बंदी आदेश/एस.आर ०९/२०२३ दिनांक २०/०४/२०२३ अन्वये सांगली जिल्हयामध्ये दिनांक २१/०४/२०२३ रोजीचे १०.०० वाजलेपासुन दिनांक ०५/०५/२०२३ रोजीचे २३.५९ वाजेपर्यंत रमजान ईद, शिवजयंती, बसवेश्वर जयंती, बौध्द पोर्णिमेनिमित्त जमाव बंदी व शस्त्र बंदीचा आदेश असताना सदर दिवशी सदर ठिकाणी आरोपी क्र. १ ते ८ यांनी बेकायदा जमाव जमवुन फिर्यादीच्या समोर व गेटच्या आत जाऊन फिर्यादीस ''दिप्या कोठे आहे त्याला मस्ती आली आहे आमच्या नादाला लागला तर त्याला जीवंत ठेवत नाही, आता नाही सापडला तर त्याला हुडकुन ठार मारतो रांडच्या, उंडगीच्या अशी शिवीगाळ केली आहे. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुद्व सांगली शहर पोलीस ठाणे, सांगली येथे फिर्याद दिली.

**अन्वेषण व दोषारोप**

३. दिनांक २९/०४/२०२३ रोजी संजयनगर पोलीस ठाणे, जि. सांगली येथील ठाणे अंमलदाराकडे वर्दीदाराने तोंडी वर्दी दिली, त्याने ती नोंदविली व त्यावरुन दखलपात्र अपराध घडल्याचे निदर्षनास आल्यामुळे पहिली खबर क्रमांक–८४/२०२३ वरील कलमाखाली नोंदविण्यात आली. पुढील अन्वेषण रविंद्र गा. आवळे ग्रेड पोलिस उपनिरिक्षक संजयनगर पोलिस स्टेशन सांगली यांच्याकडे सोपविण्यात आले. अन्वेषणादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात

आले, घटनास्थळ पंचनामा तयार केला. वरील आरोपीविरुध्द तपास पुर्ण केल्यानंतर फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम १७३(२) (यानंतर 'फौ.प्र.सं.') **भारतीय दंड विधान संहिता, १८६० कलम १४३, ४४७, ५०४, ५०६ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम १३५ अन्वये** अंतिम अहवाल न्यायालयात दाखल करण्यात आला.

**४.** अंतिम अहवाल व इतर कागदपत्रे पाहिल्यानंतर इतर आरोपींविरुध्द नि.२२ वर दोषारोप ठेवण्यात आला. सदरचा दोषारोप आरोपींना वाचून दाखविण्यात आला व समजावून सांगण्यात आला. आरोपींना सदर दोषारोपावर अपराध कबुल नाही असे नोंदविले व त्यांच्याविरुध्द संपरिक्षा चालविण्याची मागणी केली. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार वर्दीदार यांना तपासण्यात आले व अभियोग पक्षाचा पुरावा नि.१ वर आदेश पारित करुन बंद करण्यात आला. अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आला नसल्याने फौ. प्र. सं. कलम ३१३ (१)(ब) प्रमाणे आरोपीचे निवेदन वगळण्यात आले.

## मुद्दे व निष्कर्ष

**५.** अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील व आरोपीतर्फे विद्वान वकील यांचा युक्तिवाद ऐकला. वरील सर्व बाबींचा विचार केल्यानंतर व दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निर्णयीत करावयाचे मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे का कि, आरोपींनी | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | त्यांचे समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ घटनास्थळी बेकायदेशीर जमाव केला? | |
| २. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे काय की, आरोपींनी त्यांचे समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी रोडवर बेकायदेशीर जमाव करुन शिवीगाळ व दंगा केला? | ...नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबित केले आहे काय की, आरोपी यांनी समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ वर्दीदार यांना शिवीगाळ करुन अपमानीत करुन त्याला प्रक्षोभित केले आहे काय ? | ..नाही. |
| ४. | अभियोग पक्षाने हे शाबित केले आहे काय की, आरोपी यांनी समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ वर्दीदार यांना फौजदारीपात्र धाकदपटशा दाखविला आहे काय ? | ..नाही. |
| ५. | अभियोग पक्षाने हे शाबित केले आहे काय की, आरोपी यांनी वर्दीदारचे घरासमोर बेकायदा जमाव व गैरकायद्याची मंडळी जमवून मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचा दिनांक २०/०४/२०२३ रोजीचा आदेश क्र. गृह / १/ कार्या /६/ एम. ए. जी.-१ / बंदी आदेश/एस.आर ०९/२०२३ आदेशाचा भंग केला? | ..नाही. |
| ६. | कोणता आदेश ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

## मुद्दा क्रमांक १ ते ५ करिता

६. मुद्दा क्र.१ ते ५ एकमेकांतेशी संलग्न असल्याने चर्चेची वारंवारता टाळण्यासाठी सदर मुद्यांची कारणे एकत्रीतरित्या नोंदविण्यात येत आहेत.

आरोपीतर्फे घटनास्थळ व जप्ती पंचनामा अनुक्रमे **नि. ३४** असे लेखी स्वरुपात मान्य करण्यात आलेले आहे. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने साक्षीदार तपासलेले नाहीत. म्हणून घटनास्थळ पंचनामा सिद्ध झाला असे म्हणता येईल.

८. वर्दीदाराच्या व साक्षीदार क्र. १ यांच्या साक्षी पुराव्यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, त्या आरोपींना ओळखतात ते त्यांच्या परीसरातच राहतात. घटना हि दिनांक २९/०४/२०२३ रोजी दुपारी ०१.३० ते ०२.३० च्या दरम्यान त्यांच्या राहत्या घरासमोर दारात घडली होती. घटनेच्या वेळेस त्या व त्यांच्या सासु अंगणात बसलेल्या होत्या त्यावेळी त्यांच्या घरासमोरील रस्त्यावरुन एक रॅली गेली त्यामधील लोकांनी गुलाल उधळला. या व्यतिरिक्त आणखी काहीही झाले नव्हते. त्यानंतर वर्दीदार हे सांगली शहर पोलीस स्टेशन येथे दि.२९/०४/२०२३ रोजी तक्रार दिली. सदर साक्षीदाराने केवळ वर्दीजाबावरील नि.P–1 कडील सही मान्य केली आहे व त्यामधील मजकुराबाबत काहीही माहित नसल्याचे कथन केले आहे.

९. वर्दीदार व साक्षीदार क्र. १ अभियोग पक्षाच्या कथनास विसंगत अशी साक्ष देत असल्याचे पाहुन सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे, तसेच भा.पु.का. चे कलम १४५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे वरील सरतपासाचे खंडण करण्यसाठी साक्षीदाराचा पुढील सरतपास घेण्याची फौ.प्र.सं. १९७३ चे कलम १६२ (१) नुसार साक्षीदाराला उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. परंतु वर्दीदाराच्या साक्षी पुराव्यानुसार अभियोग पक्षाची सर्व कथने फेटाळून लावली. अशा प्रकारे अभियोगपक्षाच्या हकीकतीस त्याने आजिबात सहाय्य केलेले नाही. परंतु वर्दीदाराने

पोलीसांना आरोपी विरुद्ध तक्रार दिल्याचे कथन केले आहे. त्यामुळे आरोपी विरुद्ध गुन्हयात गोवण्याइतपत तोंडी प्रत्यक्ष पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

१०. आरोपी व वर्दीदार यांनी मिळुन न्यायालयात लेखी कळविले आहे की, त्यांची **नि.३३** चे पुरसिसनुसार न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणातील गुन्हे **फौ.प्र.सं.कलम ३२० (१) व (२)** प्रमाणे आपसात मिटविण्यासारखे नसल्याने वर्दीदार व आरोपी दरम्यान झालेल्या तडजोडीला कायदेशिर मान्यता व परवानगी देण्यात आलेली नाही. आरोपी हे वर्दीदार यांच्यात नातेसंबंध असल्याने ते एकमेकांचे नातेवाईक आहेत. समाजात शांतता राहावी, एकोपा राहावा या उद्देशाने दोन्ही पक्षांनी तडजोड केल्याचे दिसते. त्यामुळे त्यांना खोटा साक्षी पुरावा दिला असे म्हणून त्यांच्या विरुद्ध **फौ.प्र.स कलम ३४४ किंवा ३४० प्रमाणे** कोणतीही कारवाई करणे योग्य होणार नाही.

११. वर्दीदार व आरोपी यांच्यात किरकोळ वाद झाल्यामुळे त्यांनी वर्दी दिल्याचे मान्य केले असले तरी त्यातील मजकूर त्यांना मान्य नाही. तसेच, वर्दीदारचे आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे व त्यांच्यामध्ये प्रकरण मिटलेले आहे. वर्दीदाराला प्रस्तुत प्रकरण पुढे चालवायचे नाही किंवा कोणतेही साक्षीदार तपासायचे नाहीत. वर्दीदार यांनी अभियोग पक्षाच्या कथनास साथ दिलेली नाही. तसेच, **फौ.प्र.सं. कलम ३११ प्रमाणे** न्यायालयाला सुद्धा या खटल्याचा निर्णय न्याय्यपणे होण्यासाठी कोणतेही व्यक्तीचा साक्षी पुरावा आवश्यक असलेचे वाटले नाही. त्यामुळे न्यायालयाद्वारे कोणताही साक्षीदार तपासण्यात आलेला नाही.

१२. साक्षीदार क्र.१ वर्दीदार यांच्या पुराव्याचे एकंदरीत अवलोकन केले

असता आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोपाबद्दल कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला दिसून येत नाही. अभियोग पक्षाच्या संपूर्ण पुराव्याचे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीच्या विद्वान वकीलांचे युक्तिवाद एकत्रीतरित्या ऐकल्यानंतर आरोपीविरुध्द वर नमुद गुन्हे पुराव्याअभावी सिध्द होत नसल्याचे दिसून येते. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्ह्याचे घटक सिध्द केले नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत केल्याचे सिध्द होत नाही. म्हणुन मी मुद्दा क्र.१ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहेत.

## मुद्दा क्रमांक ६ करिता

**१३.** वरील मुद्यांचे निष्कर्ष नकारार्थी दिल्यामुळे आरोपीला त्याच्या विरुद्ध लावण्यात आलेल्या सर्व आरोपातुन निर्दोष मुक्तता करणे योग्य होईल. आरोपी व वर्दीदार यांच्यात तडजोड झालेमुळे फौ. प्र.सं.कलम ३५७ (अ) प्रमाणे प्रस्तुत प्रकरणाची मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सांगली यांचेकडे पिडीत वा जखमी व्यक्तीवर नुकसान भरपाई मिळण्यासाठी शिफारस न करणे योग्य होईल. आरोपीस फौ.प्र.सं.कलम ४३७ (अ) प्रमाणे निकटतम अपिल न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी पुढील सहा महिन्यांकरिता प्रतिभुतीसह जमानतपत्र देण्याचे निर्देष देण्यात येत आहेत. अंततः मी मुद्दा क्र.६ च्या उत्तरात आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे असे म्हणुन पुढील अंतिम आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१– मनोज रघुनाथ सरगर, आरोपी क्र.२– दिपक विलास शिंदे, आरोपी क्र.३– रविंद्र धोंडिराम माळी, आरोपी क्र.४– विश्वास उर्फ विश्वनाथ उर्फ गबऱ्या नामदेव माने, आरोपी क्र.५– विकास उर्फ चिक्या भानुदास

डोंबाळे, आरोपी क्र. ६ मनोज शहाजी जाधव, आरोपी क्र.७ अवधुत नितीन पाटील आणि आरोपी क्र. ८ प्रमोद शदर काळे यांची **भारतीय दंड विधान संहिता, १८६० कलम १४३, ४४७, ५०४ व ५०६ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम १३५ अन्वये** शिक्षेस पात्र गुन्हा केल्याचे सिध्द न झाल्याने **फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१)** अन्वये त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात येते व त्यांना सदर गुन्हयातून मुक्त करण्यात येत आहे.

०२. आरोपींनी **फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७ अन्वये** दिलेले जामीनबंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

०३. आरोपींनी **फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम ४३७–अ** च्या पुर्ततेसाठी र.रु.१५,०००/– चे बंधपत्र व जामीनदाराचे जामीनखत यापूर्वी दिलेले आहे ते कायम करण्यात येत आहे.

०४. न्यायनिर्णय **फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम ३५३(१)(क) प्रमाणे** जाहीर करण्यात आलेला आहे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात देण्यात व घोषीत करण्यात आला.)**

**Sd/–**

**सांगली** **(दिव्या प्रज्योत काळे)**

**दिनांक :०८/०५/२०२४.** **७वे सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**सांगली**

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order are same, word to word, as per the original judgment/order;

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Self. |
| Court Name | : | 7th Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Sangli |
| Date of judgment/order | : | 08/05/2024 |
| Date of Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 08/05/2024 |
| Judgment/Order uploaded on | : | 11/06/2024 |